**अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई**

---

**-: प्रेस नोट :-** **दि.२९/०८/२०२६**

**बेकायदेशिर अंमली पदार्थ जवळ बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करून अटक केल्याबाबत.**

दिनांक २८/०८/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, पोलीस पथकाने गस्तीदरम्यान खान वजीर चाळ, महाविर ज्वेलर्सच्या समोर, जी.डी आंबेकर मार्ग, परेल भोईवाडा मुंबई ४०००१२ या सार्वजनिक ठिकाणी एलएसडी डॉट्स पेपर हा अंमली पदार्थ कब्जात बाळगणाऱ्या ०२ इसमास ताब्यात घेवुन अटक केलेली आहे. अटक केलेल्या आरोपींचा तपशिल खालील प्रमाणे.

१) नितेश अनिल कांबळे, वय ३४ वर्ष, रा.ठि. भोईवाडा मुंबई.

२) शुभम जनार्धन लोखंडे, वय २९ वर्ष रा.ठि. पनवेल, नवी मुंबई.

उपरोक्त नमुद आरोपींकडुन एकूण २०४ एलएसडी डॉट्स पेपर (एकुण वजन ३.९१ ग्रॅम) अंमली पदार्थ पेपर, किं.अं.रु. ६,१२,०००/- जप्त करण्यात आलेल्या आहेत.

सदरची उत्कृष्ठ कारवाई ही श्री. देवेन भारती, मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. अनिल कुंभारे, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्रीमती पौर्णिमा चौगुले (श्रींगी), मा. पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधिर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत बांद्रा युनिटचे प्रभारी पो.नि. विशाल चंदनशिवे यांचे नेतृत्वात बांद्रा युनिट पोलीस पथकाने केली आहे.

-००-